REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2023

# गोंदिया जिल्ह्याच्या संदर्भात आदिवासी महिला विकासाकरिता राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनांचे मूल्यमापन

अलका वाल्मीक पाटील[१] , डॉ. प्रज्ञा बागडे[२]
[१]सहा. प्राध्यापक
विभागप्रमुख, अर्थशास्त्र, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया.
[२] प्राध्यापक, विभागप्रमुख अर्थशास्त्र,
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर.

**गोषवारा :**
एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील महिलांच्या प्रगतीवरुन केले जाते. आदिवासी महिलांचा विकास व सक्षमीकरण करण्यासाठी महिलांना आर्थिक पाठबळ मिळणे गरजेचे आहे. यासाठी आदिवासी महिलांना आत्मनिर्भर बनविणे,प्रशिक्षण देणे, त्या दृष्टीकोनातुन आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी आदिवासी महिलांची प्रगती होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वप्रथम त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे.त्यांच्या क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीकोणातून सरकारतर्फे आदिवासी महिलांच्या विकासाकरिता योजना तयार करुन त्या राबविण्यात याव्यात. प्रस्तुत संशोधन लेखात गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या संदर्भात राबविलेल्या गेलेल्या आर्थिक योजनांचे मूल्यामापन करुन त्यांच्या विकासात कोणत्या अमूलाग्र बदल घडून आला याचे मूल्यमापन करण्यात आलेले आहे.



**शब्दसंकेत :** आदिवासी, आर्थिक, योजना, महिला, गोंदिया, विकास.

## प्रस्तावना :

भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करतांना आदिवासी स्त्रियांचे प्रश्न सातत्याने दुर्लक्षित राहिले आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा विचार केला तर त्या भागातील, राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार आदिवासींचे प्रश्न बदलत गेले आहेत. सध:स्थितीत आदिवासी स्त्री जगण्याच्या संघर्षात भरडून निघालेली आहे. आज तिचे जगणे विरोधाभासांनी भरलेले आहे. या लोकसंस्कृतीच्या अंतर्गत अमानुष—रुढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा जोपासाल्या गेल्या आहेत याचा पहिला बळी आदिवासी स्त्रीच आहे. आज धर्म आणि जात आणि वर्ण इत्यादींचा उतरंडीच्या सगळयात खालच्या स्थानावर आदिवासी स्त्रीच आहे. आदिम संस्कृतीचे गोडवे गातांना या वास्तविकतेकडे दुर्लक्ष केले तर आदिवासी स्त्री ही आर्ट गॅलरीत भारतीय सौदर्याचा नमूना म्हणून लटकलेली दिसेल, पण प्रत्यक्षात मात्र तिच्या मुलाबाळासंह ती कुपोषणाची बळी ठरलेली दिसेल.

महाराष्ट्र राज्य स्थापनेला आज ६३ वर्ष पूर्ण झालेली आहेत. या काळात महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक प्रगती, आश्वासक, आशादायक निश्चितच आहे पण वर्षानुवर्षे वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित राहिलेले आदिवासी बांधव आजही मुख्य प्रवाहात दिसत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने महिलांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून महिलांना आरोग्य, शिक्षण, आर्थिक, सामाजिक, स्वांतत्र्यव सुरक्षितता, महिलांना रोजगार इ. प्राप्त करुन दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात आदिवासी महिलांकरिता विशेष आर्थिक व सक्षमिकरणाच्या योजना नाहीत किंवा त्यांच्यासाठी स्वतंत्र आदिवासी महिला तर नाहीच विकास महामंडळ तर नाहीत त्यामुळे आदिवासी महिलांच्या विकासाला गती प्राप्त झाली नाही. याचा प्रभाव असा की आदिवासी महिला आजही आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेली आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक धोरणानुसार आदिवासी समाजाच्या वाटयाला ९ टक्के आर्थिक तरतूदी आल्या आहेत, परंतु त्यापैकी किती योजना महिलाधिष्टीत आहे याचे उत्तर अनुत्तरीत आहे. सरसकट असलेल्या आदिवासी विकास योजनेत आदिवासी महिलेचे प्रत्यक्षात असलेले अस्तित्व अत्यंत अल्प आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१) आदिवासी विकासासाठी असलेल्या विविध योजनांचे अध्ययन करणे.
२) आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या विविध योजनांच्या उद्दिष्ट पूर्तिचे मूल्यमापण करणे.
३) गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या संदर्भात सरकारची भूमिका तपासणे.

## विविध योजनांचा अभ्यास :

महाराष्ट्र राज्य व केंद्र शासनाद्वारे आदिवासी समाजातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्या दूर करण्यासाठी आणि त्यांना इतर सामाजाच्या स्तरावर आणण्यासाठी आदिवासी उपयोजनेमार्फत आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासासंदर्भात विविध योजना राबविण्यात येत आहेत.

## उमेद (UMED) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्यातील ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोंनती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली. महाराष्ट्र राज्यात सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभांगांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोंनती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यात आलेली आहे. सदरील अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यातील पुर्ण ताकदीने अभियान राबविले जात आहे.

महाराष्ट्र राज्यातील ७१ लक्ष गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी अभियान कटीबद्ध आहे. या करीता समुदाय संघटन, गरिबांच्या गरीबांनी निर्माण केलेल्या बळकट समुदायस्तरीय संस्थांची निर्मिती, विविध पथदर्शी प्रकल्प, स्वयंसेवी व शासकीय तसेच खाजगी संस्थासोबत भागीदारी अद्यावत मनुष्यबळ संसाधन विकास पद्धती, शाश्वत उपजीविकेचे स्त्रोत उभे करण्याकरिता अभियानामार्फत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकांच्या माध्यमातून वेळेवर, किफायत व्याज दराने व नियमित वित्त पुरवठा, कृतीसंगमांच्या माध्यमातून विविध शासकिय योजनांचा गरीब कुटुंबांना लाभ मिळविण्याकरिता समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करणे, अशा अनेक नाविन्यपूर्ण व परिणामकारण पद्धतीने अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

अभियानाच्या १२ वर्षाच्या अंमलबजावणीदरम्यान राज्यभर या अभियानाची फलनिष्पत्ती दिसून येत आहे. ग्राम संघ आणि प्रभाग संघांच्या स्थापना होऊन संस्थीय बळकटीकरण होताना दिसत आहे. महिला सदस्यांच्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा विकास होताना दिसत आहे. महिलांच्या कौशल्यामध्ये वृद्धी होताना दिसत आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांचे शेती आधारित, बिगर शेती आधारित उद्योग व्यवसाय उभे राहत आहेत. उत्पादक गटांच्या स्थापना होत आहेत, शेतकरी महिला कंपनी स्थापन होत आहेत. दारिद्र्य निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित साध्य करण्यासाठी सर्व स्तरावर कालबद्ध नियोजन करण्यात आलेले आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ रोजी महाराष्ट्र सरकारचा एक विकासात्मक उपक्रम म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळ अर्थात माविमची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे सर्वात पहिले अध्यक्षपद भारताच्या माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी भूषविले आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्याची सुरुवात ही स्थापनेपासूनच अनुकूल आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने सर्वप्रथम सन १९९४ साली महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वयंसहाय्य बचत गटाच्या उभारणीचे कार्य हाती घेतले व याकरीता त्यांना आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) ची मदत झाली. या कार्यक्रमाला मिळालेली यशस्विता महिला आर्थिक विकास महामंडळाला एक नवी दिशा देणारी ठरली. सदर कार्यक्रम सन २००७ - ०८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यास सुरुवात झाली.

## मानव विकासाच्या योजना

आदिवासी महिलांच्या विकासात राबविण्यात येणाऱ्या विविध आर्थिक योजनेमध्ये मानव विकासाची योजना ही सुद्धा एक महत्वपूर्ण योजना आहे. राज्यातील अतिमागास जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी या योजनेची सुरुवात १९ जून २००६ मध्ये मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली. २६ एप्रिल २०१२ च्या शासन निर्णयानुसार मानव विकास कार्यक्रम २०१२-१३ मध्ये निरंतर पुढे चालु ठेवण्याची मान्यता देण्यात आली. मानव विकास कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळावा हा या योजनेचा उद्देश होता. मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यापर्यंत आहे. या योजनेत निवड केलेल्या २२ जिल्ह्यांमध्ये गोंदिया जिल्ह्यांचा सुद्धा समावेश करण्यात आलेला आहे.

गोंदिया जिल्हा हा सुद्धा मागास जिल्हा असल्यामुळे आदिवासींची संख्या येथे जास्त प्रमाणात आहे. तसेच आदिवासी महिलांची संख्या जास्त असल्यामुळे आदिवासी महिलांचा मानव विकास निर्देशांत काय बदल झाला हे तपासणे गरजेचे आहे. म्हणून मानव निर्देशांकाची योजना यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. सरकारच्या मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत मागास तालुक्यामध्ये महिला बचतगट आणि अनुसूचित जाती जमाती सक्षमीकरण करण्यासाठी रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्याला एक कोटी रु. वार्षिक निधी आवंटित करण्याची योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनुसूचित जमातीतील महिलांच्या रोजगार निर्मितीवर या योजनेचा परिणाम तपासणे गरजेचे आहे. कारण ही विशेष योजना महिला बचत गट, शेतकरी उत्पादक गट, आदिवासींचे वन घन केंद्र, जीवनन्नोती अभियानाचे ग्रामसंघ इत्यादीच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर जो भर देण्यात आला तो तपासणे गरजेचे आहे.

मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा, तालुका स्पेसिफिक योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीतील प्रवर्गातील लाभार्थी समुहासाठी ९०:१० या प्रमाणे अनुदान देण्याची योजना आहे. यात गरीबी निर्मूलन, उपासमारीचे समुळ उच्चाटन हे ध्येय ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे या संशोधनाअंतर्गत हे ध्येय कितपत साध्य झालेले आहेत हे तपासणे गरजेचे आहे.

## महिला बचत गट योजना

पूर्वी महिलांना चुल आणि मुल यामध्येच गुरफटन रहावे लागत असे परंतु महिला बचत गटच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षक्तीकरण करणे या उद्देशाने भारतामध्ये महिला बचत गटाची स्थापना २४ जुलै १९९१ मध्ये करण्यात आली. महिला बचत गटाची स्थापना करुन स्वयंरोजगारची निर्मिती करणे यामाध्यमातून महिलांना रोजगाराच्या प्रवाहात आणून त्यांचे आर्थिक सक्षक्तीकरण करणे या उद्देशाने स्वयं सहाय्यता बचत गटाची निर्मिती भारतात करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्रामध्ये याच काळात महिला बचत गट कार्यक्रम सुरु केला. सावकारी कर्ज आणि त्याच्या अवाढव्य व्याजातून मुक्त होण्यासाठी महिला बचत गट एकमेव पर्याय होता. सदयाच्या काळात महिला बचत गटाला बळकटी देण्याकरीता राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका आर्थिक कर्ज न्यूनतम कर्जावर भांडवल उपलब्ध करुन देत आहेत.

गोंदिया जिल्हा हा मागास असलेला जिल्हा आहे, आदिवासीं महिला या जिल्ह्यात जास्त आहेत. त्यामुळे महिला स्वयं सहाय्यता समुहाचे कार्यक्रम या जिल्ह्यात राबवित असतांना त्याचे उद्दिष्टे कितपत साध्य झाले ते तपासणे गरजेचे आहे. यामध्ये रोजगार निर्मिती, प्रशिक्षण कार्यक्रम, महिला जीवनमानातील सुधारणा करणे, सावकारी मुक्त महिला, महिला आत्मनिर्भरतेत वाढ इत्यादीच्या माध्यमातून महिलांचा विकास तपासणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

## तथ्य संकलन व निवर्चन

गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी महिला विकासाकरिता राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनांचे मूल्यमापन करण्याकरीता प्रस्तुत संशोधन लेखामध्ये नमुना म्हणून एकूण ६० आदिवासी महिला उत्तरदात्यांची निवड करुन त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तराचे विश्लेषण खालील सारणी व आलेखाद्वारे दर्शविण्यात आलेले आहे.

सारणी क्र. १


उत्तरदात्याचे वार्षिक उत्पन्न (रुपयामध्ये)

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | 20,000 पेक्षा कमी | 6 | 10 | 10 |
| 2 | 20,001 ते 30,000 | 18 | 30 | 40 |
| 3 | 30,001 ते 40,000 | 22 | 36.66 | 76.66 |
| 4 | 40,000 पेक्षा जास्त | 14 | 23.34 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. १

उत्तरदात्याचे वार्षिक उत्पन्न (रुपयामध्ये)




उत्तरदात्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता वरील सारणी व आलेख क्र. १ वरुन असे दिसून आले की, २० हजार रु. पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण १० टक्के असून २०,००१ ते ३०,००० रु. उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण ३० टक्के आहे. तसेच ३०,००१ ते ४०,००० रु. उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण ३६.६६ टक्के आहे आणि ४० हजार रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण २३.३४ टक्के आहे.


यावरुन असे निदर्शनास येते की, ३०,००१ ते ४०,००० रु. उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे. वरील संशोधनाद्वारे आपल्याला आदिवासी महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

सारणी क्र. २
मानव विकास योजनेची माहिती व सहकार्य

| अ.क्र. | योजनेची माहिती व सहकार्य | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | अधिकारी | 6 | 10 | 10 |
| 2 | सरपंच | 08 | 13.33 | 23.33 |
| 3 | आय.सी.आर.पी. | 42 | 70.00 | 93.33 |
| 4 | इतर | 04 | 06.66 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. २
मानव विकास योजनेची माहिती व सहकार्य




उत्तरदात्यांना विचारलेल्या प्रश्नांमध्ये मानव विकास योजनेची माहिती व सहकार्य हे कोणाकडून मिळते असे विचारले असता अधिकारी वर्गाकडून १० टक्के, सरपंचाकडून १३.३३ टक्के, मानव संसाधन व्यक्तीद्वारे (आय.सी.आर.पी.) ७० टक्के व इतर व्यक्तींकडून केवळ ६.६६ टक्के माहिती व सहकार्य मिळते.

वरील आलेख व सारणी क्र. २ वरुन असे निदर्शनास येते की, मानव संसाधन विकासाच्या योजनेची माहिती व सहकार्य हे आय.सी.आर.पी.द्वारे सर्वात जास्त प्रमाणात मिळते. म्हणूनच योजनेची माहिती व सहकार्य देण्यात आय.सी.आर.पी.ची भूमिका खुप महत्वपूर्ण ठरते.


सारणी क्र. ३
मानव विकास योजनेचा लाभ घेतल्यानंतर आर्थिक परिस्थितीत झालेली सुधारणा

| अ.क्र. | आर्थिक परिस्थितील सुधारणा | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | होय | 52 | 86.66 | 86.66 |
| 2 | नाही | 08 | 13.34 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. ३

मानव विकास योजनेचा लाभ घेतल्यानंतर आर्थिक परिस्थितीत झालेली सुधारणा




वरील सारणी व आलेख क्र. ३ वरुन असे दिसून येते की, मानव विकासाच्या योजनेचा लाभ घेतल्यानंतर आदिवासी महिलांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे. यामध्ये ८७ टक्के उत्तरदात्यांनी आर्थिक सुधारणा झालेली असे सांगितले आहे तसेच १३ टक्के उत्तरदात्यांनी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली नाही असे सांगितले आहे. म्हणजेच अजूनही मानव विकासाच्या योजनांमध्ये महिला आर्थिक विकासाकरीता कोणत्या उणिवा आहेत हे शोधणे गरजेचे आहे.

सारणी क्र. ४


महिला स्वयं सहायता समुह (महिला बचत गट) आर्थिक परिस्थितीमध्ये दीर्घकाळात झालेली सुधारणा

| अ.क्र. | दीर्घकाळात झालेली सुधारणा | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | होय | 47 | 78.33 | 78.33 |
| 2 | नाही | 13 | 21.67 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. ४

महिला स्वयं सहायता समुह (महिला बचत गट) आर्थिक परिस्थितीमध्ये दीर्घकाळात झालेली सुधारणा




महिला स्वयं सहायता समुह हे महिलांच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. वरील आलेख व सारणी क्र. ४ वरुन असे निदर्शनास आले की, महिला स्वयं सहायता समुहामुळे आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासात भर पडलेली आहे असे ७८.३३ टक्के उत्तरदात्यांचे मत आहे तर २१.६७ टक्के महिलांचे असे मत आहे की, त्यांच्या आर्थिक विकासात भर पडलेली नाही. कारण सरकारी अनुदानाच्या योजना या कमी मिळतात व महिला बचत गटाद्वारे जे कर्ज घेतले जाते त्याची भरपाई १ टक्का महिना व्याजाने परतफेड करावी लागते. त्यामुळे उत्पन्नाचे स्त्रोत हे आदिवासी महिलांकरीता कसे निर्माण केले जातील हे पाहणे गरजेचे आहे.

सारणी क्र. ५


उमेदअंतर्गत येणाऱ्या योजनेचा लाभ घेतल्यानंतर महिलांच्या आर्थिक परिस्थितीत झालेली सुधारणा

| अ.क्र. | आर्थिक परिस्थितीत सुधारणा | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | होय | 44 | 73.0 | 73.0 |
| 2 | नाही | 16 | 27.0 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. ५

उमेदअंतर्गत येणाऱ्या योजनेचा लाभ घेतल्यानंतर महिलांच्या आर्थिक परिस्थितीत झालेली सुधारणा




वरील सारणी व आलेख क्र. ५ वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) ही आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडतांना दिसत आहे. उमेदद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जामुळे महिलांचे आर्थिक प्रश्न बहुतेक प्रमाणात सुटल्याचे दिसून येते तसेच ग्रामीण भागात उमेदद्वारे दिल्या गेलेल्या कर्जामुळे लघु तसेच कुटीर उद्योगही मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे वरील प्रश्नांचे उत्तर शोधतांना उमेदअंतर्गत येणाऱ्या योजनेचा लाभ घेतल्यानंतर महिलांच्या आर्थिक परिस्थितीत झालेली सुधारणा दिसून येते. यामध्ये दीर्घकाळात आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे असे ७३ टक्के आदिवासी महिलांचे मत आहे तसेच २७ टक्के महिलांचे असे मत आहे की, दीर्घकाळात आर्थिक परिस्थिती अजूनही सुधारलेली नाही. त्यामुळे त्यामागील कारणे शोधने गरजेचे आहे.

सारणी क्र. ६


महिला आर्थिक विकास महामंडळातंर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेतल्यानंतर आर्थिक परिस्थिती सुधारणा झाली काय

| अ.क्र. | आर्थिक परिस्थितीत सुधारणा | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | होय | 35 | 58.0 | 58.0 |
| 2 | नाही | 25 | 42.0 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. ६

महिला आर्थिक विकास महामंडळातंर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेतल्यानंतर आर्थिक परिस्थिती सुधारणा झाली काय




वरील सारणी व आलेख क्र. ६ वरुन असे दिसून येते की, महिला आर्थिक विकास महामंडळ हे सुद्धा आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहे. महिला आर्थिक विकास महामंडाद्वारे दिल्या गेलेल्या सोयी, सवलती व दिल्या गेलेल्या कर्जामुळे ५८ टक्के आदिवासी महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे व ४२ टक्के आदिवासी महिलांमध्ये अजूनही आर्थिक विकास पाहीजे त्याप्रमाणात झालेला दिसून येत नाही. म्हणजेच महिला आर्थिक विकास महामंडळाने कार्याची व्याप्ती वाढवून उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सारणी क्र. ७


कर्जाची गरज असल्यास सावकाराकडून कर्ज घेता का

| अ.क्र. | सावकाराकडून कर्ज | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | संकलीत टक्केवारी (Cumulative Percent) |
|---|---|---|---|---|
| 1 | होय | 8 | 13.0 | 13.0 |
| 2 | नाही | 52 | 87.0 | 100.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

आलेख क्र. ७

कर्जाची गरज असल्यास सावकाराकडून कर्ज घेता का




वरील संशोधनामध्ये मानव विकासाच्या योजना, महिला स्वयं सहायता समुह, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ योजनेचा विचार केल्या गेलेला आहे. वरील सर्व योजना या आदिवासी महिलांना कमी व्याजदारामध्ये कर्ज, सरकारी अनुदान (रक्कमेमध्ये) तसेच सरकारी अनुदान (वस्तूमध्ये) दिले जाते. त्यांच्या पैशाची गरज ही वरील योजनांद्वारे पूर्ण होतांना दिसून येते म्हणूनच सावकाराद्वारे कर्ज घेण्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. त्यामुळे उत्तरदात्या आदिवासी महिलांमध्ये सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण १३ टक्के दिसून येते म्हणजेच सावकाराच्या आर्थिक छळापासून मुक्त होण्याचे प्रमाण वाढत आहे.

सारणी क्र. ८


गोंदिया तालुक्यातील आदिवासी महिलांनी विविध योजनांचा लाभ घेण्यापूर्वीचे व लाभ घेतल्यानंतरच्या उत्पन्नातील बदल

| अ.क्र. | उत्पन्न (रु.) | योजनेचा लाभ घेण्यापूर्वीचे उत्पन्न | | योजनेचा लाभ घेतल्यानंतरचे उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) | वारंवारीता (Frequency) | टक्केवारी (Percent) |
| 1 | 20,000 पेक्षा कमी | 6 | 10 | 4 | 6.66 |
| 2 | 20,001 ते 30,000 | 18 | 30 | 14 | 23.33 |
| 3 | 30,001 ते 40,000 | 22 | 36.66 | 27 | 45.0 |
| | 40,000 पेक्षा जास्त | 14 | 23.34 | 15 | 25.0 |
| | **एकूण** | **60** | **100.0** | **60** | **100.0** |

**स्त्रोत : प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित**

सारणी क्र. ८

गोंदिया तालुक्यातील आदिवासी महिलांनी विविध योजनांचा लाभ घेण्यापूर्वीचे व लाभ घेतल्यानंतरच्या उत्पन्नातील बदल




सारणी व आलेख क्र. ८ वरुन असे निदर्शनास येते की, आदिवासी महिलांनी आर्थिक विकासाच्या विविध योजनांचा लाभ घेतल्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होतांना दिसत आहे. योजनांचा लाभ घेण्यापूर्वीचे उत्पन्न व योजनांचा लाभ घेतल्यानंतरच्या उत्पन्नाचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की, योजनांचा लाभ घेतल्यानंतर आदिवासी महिलांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झालेली दिसून येत आहे.

## निष्कर्ष :

१. सरकारच्या विविध योजनांचा आर्थिक लाभ घेतल्यामुळे आदिवासी महिलांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे असे दिसून येते.
२. आदिवासी महिलांनी विविध आर्थिक विकासाच्या योजनांचा लाभ घेतल्यामुळे दीर्घकाळात त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे.
३. सरकारच्या आर्थिक विविध योजनांचा लाभ आदिवासी महिलांना मिळवून देण्यामध्ये आय.सी.आर.पी.ची भूमिका खुप महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.
४. सरकारच्या आर्थिक विविध योजनांचा लाभ घेतल्यामुळे आदिवासी महिलांचे सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण कमी होतांना दिसत आहे.

## शिफारसी :

१. सरकारच्या आदिवासी महिलांकरीता ज्या विविध आर्थिक योजना आहेत त्यातील उणिवा दूर करणे गरजेचे आहे.
२. सरकारच्या अनुदानीत योजना राबविण्यात सरकार उदासिन दिसत आहे म्हणून अनुदानीत योजना वाढविणे गरजेचे आहे.
३. अजूनही आदिवासी महिला सावकारी पाशातून पूर्णपणे मुक्त झालेली नाही त्यादृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.
४. सर्वात महत्वाचे म्हणजे आदिवासी महिला ही आर्थिकदृष्ट्या अजूनही कमकुवत आहे तिचा स्वतंत्र विचार होणे गरजेचे आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१. कवि, प्रा. सौ. माधवी, 'महिला कल्याण आणि ग्रामिण विकास' विदया प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००६.
२. गजभिये, प्रा.कु. प्रज्ञा, 'महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडहाच्या कार्याचे आर्थिक मुल्यमापन', पिएच.डी. प्रबंध नागपूर विद्यापिठ, नागपूर

३. आहुजा राम, 'भारतीय सामाजिक समस्या,– रावत पब्लिकेशन्स, जयपूर १९९५.
४. महाजन, संजीव, 'ग्रामीण समाजसंस्था', अर्जुन प्रकाशन हाउस, दिल्ली २००४.
५. कुलकर्णी, डॉ.बी.डी., ढमढेरे, डॉ. एस.व्ही., 'अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती', डायमंड प्रकाशन पूणे २००७
६. मंगनाळे, प्रा. डॉ. व्ही.एस. जगताप प्रा. शिवाजी, 'महिला बचत गट आणि ग्रामिण विकास, मुक्तरंग प्रकाशन लातुर प्रथम आवृत्ती २०११
७. गारे गोविंद, (२००२) ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पूणे.
८. सांगवे विलास, (१९८७) आदिवासीचे सामाजिक जिवन, पाप्युलर प्रकाशन, मुंबई
९. आगलावे प्रदीप (२०००) संशोधन पध्दतिशास्त्र व तंत्रे, विदया प्रकाशन, नागपूर
१० लोटे रा.ज. (२००४) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर
११ कऱ्हाडे बी. एम. (२००९) आदिवासी प्रश्न आणि समस्या, पिंपळापूरे अण्ड पब्लिशर्स नागपूर
१२ दत्त गौरव, महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, एस चन्द अण्ड कंपनी दिल्ली
१३ कोळंबे रंजन (२०१४) भारतीय राज्यघटना आणि प्रशासन भागीरथ प्रकाशन, पूणे
१४ बोधनकर सुधिर, अलोणी विवेक (२००३) समाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
१५ गजभिये प्रज्ञा, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्याचे आर्थिक मुल्यमापण, पिएच.डी. प्रबंध नागपूर विद्यापीठ नागपूर
१६ देवगांवकर शैलजा, देवगांवकर श.गो., (२००१) आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन नागपूर
१७ नाडगोंडे गुरुनाथ द., (१९८६) भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे.
१८ काचोळे दा.धो., समाजशास्त्रीय सिध्दांत, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरगाबांद, २००२.
१९ कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर २००७.
२० गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००२.
२१ गारे गोविंद, आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.
२२ घाटोळे रा.रा., समाजशास्त्रीय संशोधन : तत्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर २००३.
२३ देवगांवकर एस.जी., आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.
२४ तुमराम विनायक, आदिवासी साहित्य स्वरुप आणि समिक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, १९९९.
२५ नागतोडे गुरुनाथ, संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११.
२६ पगार एस.के., आदिवासी विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भुमिका, अर्थसंवाद, खंड ३५ अंक ३, ऑक्टो–डिसेंबर, २०११.
२७ पंडीत नलावडे, विकासाच्या मार्गावर आदिवासी, योजना खंड XXXVI, अंक २, सप्टेंबर २००८.
२८ पाटील वा.भा., संशोधन पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.